# जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

## मलेरिया विभाग

मलेरिया/ कार्या.क्रं.१/जा.क्र./ ३० २०१७-१८ दिनांक :- २९ / ५ /२०१७

## फेर जाहिर सुचना (पहिली वेळ)

जळगांव शहरातील तमाम बांधकाम व्यवसायीकांना व इतर नागरीकांना कळविण्यात येते की, शहरामध्ये मलेरिया डेंग्यु, चिकुन गुणिया या सारख्या साथीच्या रोगांवर आळा घालण्यांकरीता शहरातील बांधकाम व्यवसायीकांकडून वाढत्या शहरी कारणमुळे शहर व शहरलगतच्या परिसरात बांधकाम व्यवसायीकांची प्रचंड वाढ दिसून येत आहे. या नविन बांधकामाच्या जागांवर ( नविन बांधकामाच्या जागेवर ) वेगवेगळया प्रकाराने पाणी साठविले जाते, महानगरपालिकेच्या असे निदर्शनास आले की, बांधकाम साईटवर या पाण्यामधून डासांची उत्पत्ती स्थाने मोठया प्रमाणांवर तयार होत आहे. त्यामुळे शहरात डेंग्यु, मलेरिया, चिकुन गुनिया या रोगांचा प्रसार / प्रार्दुभाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी प्रत्येक खाजगी बांधकाम व्यावसायीकांकडून खालील प्रमाणे उपाययोजना करणे बंधनकारक आहे. त्यासाठी पेस्ट कंट्रोल सेवा पुरविणे बाबत नोंदणीकृत संस्था अथवा अनुभवी असणाऱ्या संस्थेकडून जळगांव शहर महानगरपालिका जळगांव या नांवे संस्थेने लेटरहेडवर पेस्ट कंट्रोल ईच्छुक संस्था असतील अशांनी सदरची जाहिर सुचना प्रसिध्द केल्यापासून ७ दिवसांचे आंत दरासह अर्ज सादर करावेत. सदर कामी खालील प्रमाणे अटी शर्ती राहतील त्या अनुसरुन सदर संस्थेची नियुक्ती केली जाईल.

**<u>अटी व शर्ती</u>**

१. सदर संस्था स्थानिक नागरीक संस्था किंवा तत्सम संस्थेचा काम करणाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

२. डांस अळी प्रतिबंधक फवारणी आंतरीक डांस प्रतिबंधक फवारणी संसर्ग किट नियंत्रण व बाहय धुरळणी या सारख्या कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

३. अर्ज करणाऱ्या संस्थेची पेस्ट कंट्रोल व्यवसायीकांची आर्थिक उलाढाल मागील तीन वर्षात किमाल १० लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक असावी. राज्यातील इतर महानगरपालिकाकरीता या समकक्ष कामाचा अनुभव असल्यास प्रथम प्राधान्य देणेत येईल.

४. अर्ज करणाऱ्या संस्थेकडे वैद्य परवाना सेवाकर नोंदणी प्रमाणपत्र तसेच किटकशास्त्र विषयांशी संलग्न पदवी असलेले तंत्रज्ञ असणे आवश्यक आहे.

५. सदर कामी रु.२०,०००/- सुरक्षा अनामत रक्कम ऑनलाईन लागेल.

६. आलेले अर्ज हे ६० दिवसांकरीता वैद्य असतील या संदर्भातील अधिनियम अटी व तपशिल करीता रु.२०००/- शुल्काचा भरणा केल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देता येईल.

७. संस्थेकडे केंद्र शासनाशी संलग्न कृषी मंत्रालयाची मान्यता असावी.

८. संस्थेकडे शासनाच्या अंगीकृत व्यवसायीक संस्थांकडून प्रशिक्षण घेतलेले तज्ञ कर्मचारी असावेत. तसे प्रतिज्ञा पत्र सादर करावे लागेल.

२२/५/१७

(लक्ष्मीकांत कहार)
उपायुक्त,
जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव

०१८